IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# "मध्ययुगीन कालखंडातील भक्ती आंदोलनाचे विचार आणि प्रभाव विशेषता दक्षिण भारत, महात्मा बसवेश्वर महाराज,आणि महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय"

**श्री सुनिल पंडित वाघमोडे, डॉ.आर.एन.कांबळे**

[1]संशोधक विद्यार्थी

[2]मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर

**Article Info**

***Article History:***

Received: 20th February 2026

Accepted: 01st March 2026

Published: 07th March 2026

***Keywords:***

*भक्ती, भक्ती चळवळ,वारकरी संप्रदाय,अलवार, नायनार, कर्नाटक, महाराष्ट्र, दक्षिण भारत*

**ABSTRACT**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मध्ययुगीन काळातील भक्ती म्हणजे काय? वेगवेगळ्या संप्रदायापासून सुरुवात झालेली भक्तीचे रूपांतर आंदोलनामध्ये कसे झाले याविषयी मांडणी केली आहे. भक्ती चळवळीचे प्रादेशिक स्वरूप,शिकवण, तत्वे आणि विचार यांचे साम्य असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र मध्ये वारकरी संप्रदायाने भक्ती आंदोलनला एक लोक जागरण निर्माण करण्याचे आणि रूढी परंपराना शह देण्याचे काम केल्याचे दिसून येते. तसेच या शोधनिबंधामध्ये दक्षिण भारत विशेषता तमिळनाडू, कर्नाटक व महाराष्ट्र या प्रादेशिक भागाची मांडणी केली आहे. या भागातील संतांचे साहित्याची माहिती देण्यात आली आहे.

प्रस्तुत शोधिबंधामध्ये उद्दिष्टे,गृहितके,संशोधन पद्धती, भक्तीचे स्वरूप, संतांची माहिती तसेच निष्कर्ष याविषयी मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Waghmode, Sunil Pandit, & Kamble, R. N.** (2025). "मध्ययुगीन कालखंडातील भक्ती आंदोलनाचे विचार आणि प्रभाव विशेषता दक्षिण भारत, महात्मा बसवेश्वर महाराज, आणि महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय". *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **431–437**.

**प्रस्तावना -:**

युरोप मध्ये मध्ययुगीन कालखंडात सामंती व्यवस्था ,युद्ध ,अंधविश्वास आणि धर्माचे प्राबल्य वाढल्यामुळे हा काळ अंधकार युग मानला जातो.या युगात प्रकाश टाकण्याचे आणि धार्मिक प्राबल्य कमी करण्याचे काम पुनर्जागरण (Renaissance) काळाने केले आहे. भारता मध्ये अशीच परस्थिती निर्माण झाली होती. समाजव्यवस्था मध्ये धर्माचे प्राबल्य, रूढी, परंपरा ,अंधश्रद्धा वाढले होते. अश्या समाजव्यवस्थेला छेद देण्याचे काम भक्ती आंदोलनाने केले आहे. भक्ती आंदोलनाची सुरवात दक्षिण भारतात झाली असून त्याचा विस्तार उत्तर भारतापर्यंत आणि महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून दिसून येतो.

भारतात भक्ती आंदोलन एक ऐतिहासिक आंदोलन म्हणून उदय झाला. भक्ती आंदोलनाची सुरुवात दक्षिण भारतात अलवार व नयनार संप्रदायातून झाला. भक्तींचे महत्त्वपूर्ण विशेष म्हणजे रूढी,परंपरा, अंधश्रद्धा,मूर्ती पूजा आणि संस्कृत भाषेला छेद देण्याचा प्रयत्न केला आहे. भक्ती आंदोलनाने साहित्य निर्मितीत स्थानिक भाषेला महत्त्व दिले आहे. दक्षिण भारतात कर्नाटक मध्ये संत बसवेश्वर महाराजांनी कन्नड भाषेत वचनाची निर्मिती केली. तमिळनाडूमध्ये अलवार आणि नयनार या संप्रदायाने साहित्यात तमिळ भाषेचा प्रयोग केला. महाराष्ट्र मध्ये संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत जनाबाई, संत नामदेव आणि संत एकनाथांनी मराठी भाषेत अभंगाची रचना केली. महाराष्ट्रात मध्ययुगीन काळात वारकरी संप्रदायाने भक्ती तत्वाचा पुरस्कार करून समाजातील तळागाळातील लोकांना आपल्यात सामावून घेतले. जातिभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा विचारांचा विरोध करून विज्ञाननिष्ठा आणि विवेक निष्ठा शिकवण या संप्रदायाने दिले. भजन,कीर्तन,प्रवचन आणि इतर प्रबोधानच्या माध्यमातून सामान्य लोकांना तर्कशुद्ध विचाराची दृष्टी दिली.

**संशोधन लेखाची उद्दिष्टे** -:

१) मध्ययुगीन कालखंडातील भक्ती चळवळीची पार्श्वभूमी जाणून घेणे.
२) भक्ती आंदोलनाची प्रादेशिक विस्तार आणि प्रभाव संबधी मांडणी करणे.
३) भक्ती आंदोलनाची वैशिष्टे आणि तत्वाची ओळख करून घेणे.
४) महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा समाजावर पडलेल्या प्रभावा विषयी माहिती करून घेणे.
५) संत बसवेश्वर महाराजांचे भक्तीविषयक विचार समजून घेणे.

**संशोधनाचे गृहीतके**

१) भक्ती आंदोलनामुळे सुरवात दक्षिण भारतातून झाल्याचे दिसून येते.
२) भक्ती आंदोलनामध्ये साहित्याची निर्मिती स्थानिक भाषेत झाली.
३) मध्ययुगीन काळात वारकरी संप्रदायांनी सामाजिक चळवळ म्हणून काम केले.

**संशोधन पद्धती -:**

प्रस्तुत शोध निबंधाकरिता ऐतिहासिक संशोधन पद्धती,संदर्भान्वयी व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**भक्तीचा अर्थ** –

भक्ती शब्द उत्पत्ती संस्कृतच्या 'भज' या शब्दा पासून झाला असून त्याचा अर्थ सेवा करणे असा होतो. भक्ती (संस्कृत: भक्ति:) चा शाब्दिक अर्थ आहे "संलग्नता, सहभाग, प्रेम, श्रद्धा, श्रद्धा, प्रेम, भक्ती, उपासना, शुद्धता होय". इ.स. तिसऱ्या शतकातील भागवतधर्मापासून भक्तीमार्ग सुरू झाल्याचे शरद बेडेकर म्हणतात. भगवद्गीतेत भक्तीसंबंधी तपशीलाने विवेचन आले आहे. भक्तीचा अधिक व्यापकपणे विचार डॉ. रावसाहेब कसबे याने मांडला आहे. ते म्हणतात "भक्ती ही खऱ्या अर्थाने ईश्वर संकल्पनेच्याद्वारे माणसाचा शोध घेणारी साधना आहे." यावरून असे दिसून येते कि भक्ती संकल्पाने ईश्वर हा निमित्त असून, ईश्वराला प्रतीक मानून सामान्य लोक भक्तीचा अधिकार घेतात आणि ते व्यक्त होऊ लागतात.भक्ती सामान्यः सगुण आणि निर्गुण स्वरुपात केली जाते. जे मूर्तिपूजा करतात त्यांना सगुणोपासक म्हटले जाते. आणि जे लोक ईश्वराला निर्गुण-निराकार मानतात, त्यांना निर्गुणोपासक म्हटले जाते.

**भक्ती चळवळीची मुख्य तत्त्वे होती :**

(१) देव एक आहे.

(२) देवाची उपासना करण्यासाठी माणसाने मानवतेची सेवा केली पाहिजे.

(३) सर्व मनुष्य समान आहेत.

(४) धार्मिक विधी करण्यापेक्षा आणि तीर्थयात्रेला जाण्यापेक्षा देवाची भक्तिभावाने पूजा करणे श्रेष्ठ आहे.

(५) जातीभेद,रूढीपरंपरा आणि अंधश्रद्धा सोडून द्याव्यात.

**भक्ती चळवळीची वैशिष्ट्ये**

१) भक्ती एकेश्वरवादी चळवळीशी निगडित असून सर्व संतानी कांही समान शिकवणी दिली आहे.ज्यामुळे भक्ती चळवळीला त्याचे मूलभूत ऐक्य मिळते. बहुसंख्य संत एकेश्वरवादी असून ते खालच्या जातीतील होते. विचारांच्या समानतेची त्यांना जाणीव होती. बहुतेकांना एकमेकांच्या प्रभावाची आणि शिकवणीची जाणीव होती. त्यांच्या गीतांमध्ये एकमेकांचा आणि त्यांच्या पूर्वजांचा अशा प्रकारे संदर्भ देतात की ते त्यांच्यातील सामंजस्यपूर्ण वैचारिक आत्मीयता सूचित करतात.

२) भक्ती चळवळ मध्ये अनेक संतानी मूर्तीपूजेला विरोध केला आहे.

३) एकेश्वरवादाने एक मार्ग स्वीकारला जो त्या काळातील प्रमुख धर्म, हिंदू आणि इस्लाम या दोन्ही धर्मापेक्षा वेगळा होता. त्यांनी दोन्ही धर्माच्या अंधश्रद्धा आणि सनातनी पैलूंवर टीका केली

४) ज्ञान आणि कर्ममार्गाच्या वर भक्तीचे उदात्तीकरण झाले आहे.

**भक्ती चळवळीचा ऐतिहासिक विकास –**

भारतामध्ये भक्तीचा प्रवाह अविरत वाहत आहे. भक्ती ही हिंदू धर्मातील एक चळवळ आहे.जी विष्णू, शिव आणि कृष्णाच्या रुपात केली जात होती. वेदामध्ये विष्णूची स्तोत्रे आहेत.परंतु त्याची लोकप्रियता कांही आर्य देवताशी ओळखीमुळे झाली असावी.भक्ती चळवळ विष्णू आणि शिव या देवतावर केंद्रित होती.शिव हा अनार्य वंशाचा असावा असे वाटते.त्यामुळे भक्तीचे मूळ आर्य नसलेले दिसते.पद्मपुराणात भक्ती ही द्रविड भूमीत उत्पत्ती झाल्याचे दिसून येते. भक्तीची चळवळीचा प्रारंभ तामिळनाडूत सातव्या शतकापासून झालेला आहे. तेथील नायनार आणि आलवार या शैव आणि वैष्णव पंथातील संतांनी या चळवळीचा पाया घातला. नंतर ही चळवळ कर्नाटकात गेली. त्याचा स्पर्श महाराष्ट्राला झाला. महाराष्ट्रात मात्र भक्तीचा उत्कर्ष झाला. या संदर्भात भागवतपुराणात एक श्लोक आहे.

**"उत्पन्ना द्रविडे साहं वृद्धी कर्नाटके गता।**
**क्वचित्क्वाचिन्महाराष्ट्र गुजरे जाणता गता "।।**

या श्लोकाचा अर्थ असा की, भक्ती द्रविड प्रदेशात उत्पन्न झाली, कर्नाटकात ती वाढली, महाराष्ट्रात तिला सन्मान प्राप्त झाला. परंतु गुजरातेत गेल्यानंतर मात्र ती जीर्ण झाली. आलवारनी भगवान विष्णूला श्रद्धा आणि उपासनेच देव म्हणून स्वीकारले त्यांना वैष्णव म्हंटले गेले. तर नयनारणी शिवची उपासना केली त्यांना शैव म्हंटले गेले. यातील अनेक संत खालच्या जातीतील होते. ही चळवळ कांही काळ समाजाच्या खालच्या जाती पर्यंत मर्यादित राहिली असावी.

**दक्षिण भारतातील भक्ती चळवळ**

**अलवार-** अलवार हे दक्षिण भारतातील सर्वात प्राचीन वैष्णव कवी-संत आहेत.ज्यांनी विष्णूबद्दलच्या तीव्र भक्तीप्रेमाने भरलेल्या त्यांच्या तमिळ भाषेत स्तोत्रांसह परमेश्वराचा गूढ महिमा प्रगट केला आहे. अल्वर या शब्दाचा अर्थ असा आहे की, 'ज्याला ईश्वराचे गूढ अंतर्ज्ञानी ज्ञान आहे'आणि जो ईश्वरी चिंतनात उदयास आला आहे. त्यांच्यापैकी १२ जणांनी प्रामाणिक मान्यता प्राप्त केली आहे. 4000 श्लोक असलेल्या अल्वारांच्या स्तोत्रांच्या संग्रहाला 'नालायरा-दिव्य-प्रबंधन' म्हणतात. इ.स 700-1000 पासून या अल्वारांची भरभराट झाली. अल्वारांनी देवावरील त्यांच्या उत्तुंग भक्तीने स्वतःचा पूर्णपणे त्याग केला. भक्त भगवंत सोडून बाकी सर्व विसरतो.त्याची भक्ती भगवंतावरील प्रेम, स्थळ आणि काळाच्या पलीकडे असते. दक्षिण भारतातील नायनार आणि आळवार या दोन्ही पंथाच्या संदर्भात मनमाडकर महाराज लिहितात, "माणिक्कवाचक, संबंध, वाणीश आणि सुंदर इत्यादि शैव संत एकूण ६४ झाले. यातील चार निर्दिष्ट संतांनी अमृतवाणी संकलित करून दोन साहित्य ग्रंथांची निर्मिती केली. 'देवरम्' - भगवत प्रेमाचा हार आणि दुसरा 'तिरूवाचक्कम = पवित्रवाणी तसेच, वैष्णव संत जे झाले ते 'आळवार' म्हणून प्रसिद्ध आहेत.

आळवार म्हणजे 'अध्यात्मसागरात सखोल बुडी मारून बसणारी व्यक्ती' हे संत भगवंताचे खरे निस्सीम उपासक होते. भगवान विष्णूच्या नितांत प्रेमात स्वतः विलीन होऊन इतरांसही विलीन करणे हे त्यांच्या जीवनाचे व्रत होते."

**नयनार** – नायनार हे शिवभक्त असून त्यांची संख्या 63 होती. त्यामध्ये प्रमुख तिरूनावुक्करशु, तिरूज्ञान सम्बन्दर, सुन्दरमूर्ति तथा मणिक्कवाचगर प्रमुख होते. नयनार संता मध्ये 'कराईक्काल अम्मैयार' ही प्रमुख महिला संत होती. त्यांचे भक्तिगीते 'तैवरम' ग्रंथा मध्ये संकलित केले आहे.

**नयनर आणि अल्वारची वैशिष्ट्ये**

१) बौद्ध आणि जैन यांच्यावर अत्यंत टीका करत होते.

२) पुलैयार आणि पनार सारख्या अस्पृश्यांसह सर्व जातींना परवानगी दिली.

३) संगममध्ये सापडलेल्या प्रेम आणि वीरतेच्या कल्पनांवर लक्ष केंद्रित केले.

४) मोक्षाचा मार्ग म्हणून शिव ( नयनार ) किंवा विष्णू ( अल्वर ) यांच्यावरील प्रेमाचा उपदेश केला.

५) स्थानिक गावांमध्ये पूजल्या जाणाऱ्या देवतांची स्तुती करणाऱ्या कवितांचे पठण केले. त्यांनी अल्वार आणि नयनर यांच्या हॅगिओग्राफी (संतांचे चरित्र) देखील रचल्या.

६) महिला संत देखील उदयास आले: 63 नयनार आणि 12 अल्वर संत आहेत.त्यापैकी अंडाल या एकमेव महिला अल्वर होत्या आणि कराइक्कल अम्मैयार , मंगयार्ककरसियार आणि इसैग्ननियार या महिला नयनर होत्या.

**महात्मा बसवेश्वर महाराज (इ.स. ११०५ – इ.स. ११६५)**

संत बसवेश्वर महाराज हे कर्नाटकातील समाजसुधारक होते. बसवेश्वरांचा जन्म कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी येथे ११३१ साली अक्षय्य तृतीयेला झाला. त्यांच्या आईचे नाव मादलांबिके आणि वडिलांचे नाव मादिराज होते.महात्मा बसवेश्वरांनी इष्टलिंगाची निर्मिती करून समतावादी 'वीरशैव लिंगायत' धर्माची स्थापना केली. "लिंग धारण करणारा तो लिंगायत" असा लिंगायत शब्दाचा अर्थ आहे. वर्ण, वंश, लिंग (स्त्री - पुरूष), जात, जन्म ठिकाण असा कोणताही भेदभाव न करता प्रत्येक स्त्री-पुरुषाला लिंग धारण करून लिंगायत होता येते. त्यांनी हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेविरुद्ध व अन्य हानिकारक प्रथांविरुद्ध संघर्ष केला. त्यांनी निर्गुण, निराकार एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार केला. महात्मा बसवेश्वर यांच्या चळवळीत मातंग चेन्नय्या, डोहर कक्कय्या, हडपद अप्पाण्णा, नुलीय चंदय्या, कुंभार गुंडय्या, चांभार हरळय्या, अंबिगर चौडय्या, मेदार बुरुड केतय्या, तुरुंगाहि रामण्णा, मादार धूळय्या, वैद्य संगण्णा, कन्नप्पा तेली, किन्नरी, बोमय्या, अल्लमप्रभु, बहुरूपी चौडय्या, शरण सुरय्या, शरण उरलिंगदेव हे शरण शुद्रातिशूद्र समजल्या जाणाऱ्या जातीतून बसवांच्या चळवळीत सहभागी झाले.

समाजामध्ये लोक ज्या गोष्टी आपल्या आचरणात येणे कठीण आहे त्याच गोष्टीच्या बाह्य अवडंबराने स्वतः शुद्ध मनाचे आहोत असा खोटा आव आणतात. जे देवाला दूध, लोणी, तूप अर्पण करतात ते अंधभक्त होत. त्या संदर्भात बसवण्णा म्हणतात,

**दुग्ध ते उच्छिट तथा वासराचे। पाणी ते मत्स्याचे उच्छिष्टची।**
**पुष्प ते उच्छिट तथा भ्रमराचे। साधन पूजेचे काय सांगा ?**

दूध हे वासराचे उष्ट असते, पाणी माशांचे उष्ट असते, पुष्प भ्रमराचे उष्ट असते असे वापरलेले अस्वच्छ उष्ट साधने देवाच्या पूजेचे साधन होऊ शकते का.असा प्रश्न उपस्थित करतात. अशाप्रकारे बसवण्णांनी अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीयता, बळी प्रथा,इत्यादींवर प्रखर हल्ला केला आहे. संत बसवण्णांनी 'अनुभव मंटपाची' स्थापना केली. त्यातून साहित्य निर्माण केले.उच्चनीचता ,कर्मकांडे, पशुबली ही थोतांडे नाकारली व लिंगायत धर्माची स्थापना केली. वेद शास्त्राला विरोध करताना वचनाची निर्मिती कन्नड भाषेत केली आहे. बसवण्णा म्हणतात, मंदिर म्हणजे बहुजनांचे अंधश्रद्धा व भोळी मनोवृत्तीचे केंद्र आहे. देवालयापेक्षा देहालय श्रेष्ठ आहे. अशी शुद्ध विचारसरणी बसवण्णांची होती. महात्मा बसवेश्वरांचा लिंगायत धर्म प्रामुख्याने दलित संवेदनेवर आणि मानव जातीच्या तत्वावर आधारलेला आहे. बसवेश्वर पहिले क्रांतिकारी धर्मविचारक होते. महिलांना मुक्तीचे पंख देणारे व भारतातील समतेचे जनक म्हणून बसवेश्वरांच्या विचाराकडे पाहता येईल. महात्मा बसवेश्वरांनी अनेक स्त्री वचनकारांना व अलमप्रभू, चन्नबसवेश्वर, सिद्ध रामेश्वर अशा अधिकारी पुरूषांना एकत्र आणून स्त्री-पुरूष समानतेचा पाया रचण्याचे काम केले. बसवण्णांनी जो पाया रचला त्यावर खऱ्या अर्थाने कळस चढविण्याचे काम वैराग्य योगीनी अक्कमहादेवी, आयदक्की लक्कम्मा, रेवम्मा यांच्यासारख्या स्त्री

वचनकारांनी केले

**अक्का महादेवी-**

संत बसवेश्वरांनी नंतर अक्का महादेवीने कर्नाटकात भक्ती चळवळीचा प्रसार केला. त्याने लिंगायत शैव पंथाचा स्वीकार केला.सुमारे 350 गीत कविता किंवा वचने अक्का महादेवी रचली आहेत. मंत्रगोप्य आणि योगंगात्रिविध नावाचे दोन छोटे लेखन कन्नड साहित्यातील तिचे ज्ञात योगदान मानले जाते चेन्नमल्लिकार्जुन ( शिव ) वरील तिच्या भक्तीचे वर्णन करण्यासाठी तिच्या कृतींमध्ये वारंवार अवैध किंवा व्यभिचारी प्रेमाचे रूपक वापरले जाते. अक्काचा ज्ञानप्राप्तीचा शोध सोप्या भाषेतील पण बौद्धिक कठोर कवितांमध्ये नोंदवलेला आहे. गीतांमध्ये अक्का महादेवी सक्रियपणे चेन्नमल्लिकार्जुन ( शिव ) शी नातेसंबंध शोधत असल्याचे दर्शविते आणि त्याग, दैहिक प्रेम आणि वेगळेपणा या विषयांना स्पर्श करते. जे प्रस्थापित सामाजिक संस्था विरोधात होते. कन्नड साहित्यातील आणि कर्नाटकच्या इतिहासातील एक प्रमुख स्त्री व्यक्तिमत्त्व मानले जाते.

**महाराष्ट्रात भक्ती (वारकरी) चळवळ**

वारकरी संप्रदायाचे अद्यादैवत मानला गेलेला श्रीविठ्ठल हा वारकरी संप्रदायाचा प्रेरक स्त्रोत मानला गेला आहे. मध्ययुगीन काळात हिंदूंच्या जीवनात अनेक बदल घडवून आणणाऱ्या मध्ययुगीन भक्ती चळवळीचा महाराष्ट्रीय लोकांच्या जीवनावर खोलवर परिणाम झाला. भक्ती चळवळीचे मूळ शोधणे अवघड आहे, परंतु महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर (१३वे-१४वे शतक) हे मध्ययुगीन भक्ती चळवळीचे प्रणेते मानले जातात. त्यांनी भगवद्गीतेवरील भाष्य 'ज्ञानेश्वरी' ची रचना मराठी भाषेत केले. त्यांनी महाराष्ट्रातील चळवळीला एक भक्कम तात्विक पाया दिला. संतांनी लोकांना जगाचा त्याग करण्याचा सल्ला दिला नाही, परंतु आध्यात्मिक आणि ऐहिक प्रगती यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. संत ज्ञानेश्वर सांगतात की, अविद्या घालविणे हा ग्रंथाचा विषय आहे. विद्येचा नाश करणे आणि मोक्षप्राप्ती घडवण्यासाठीचे साधन म्हणजे ज्ञान होय.

**"मी अविवेकाची काजळी। फेडूनी विवेकदीप उजळी ।। तै योगिया पाहे दिवाळी। निरंतर ।।"**

माणसाच्या ठिकाणी अज्ञान, अविद्या किंवा अविवेक असल्याने त्याला आत्मज्ञान होत नाही किंवा त्याचा आत्मविकास होत नाही. अविवेक हाच दुःखाला कारण असून, अविवेकाची काजळी मनःपटलावर तयार झालेली असते. ती काजळी काढून त्या ठिकाणी मी विवेकाचा दीप उजळवतो, ह्या दीपाने तुमच्या आयुष्यात दिवाळीचा आनंद निर्माण होईल असे संत ज्ञानेश्वर सांगतात. विवेकाच्या प्रकाशात जीव सद्विचाराकडे जातो.

संत नामदेवांची भूमिका तत्वचिंतकाची नसली, तरी लडिवाळ लेकराने मातेवर प्रेम करावे, तशी ईश्वरभक्ती करण्याचा आदर्श त्यांनी निर्माण केला. ज्ञानदेव-नामदेवांनी बहुजन समाजाच्या आध्यात्मिक आकांक्षांना जागे केले. त्या समाजातील माणसांना आत्माविष्काराची वाट मोकळी करून दिली. विठ्ठलभक्तिने भारलेले विविध जातींचे लोक विठ्ठलभक्तिने भारावलेल्या रचना करू लागले. गोरा कुंभार (१२६७-१३१७), सावतामाळी (१२५०-९५), नरहारी सोनार,चोखामेळा,सेना न्हावी (तेरावे शतक) इ. संतांची एक मालिकाच उभी राहिली. वेगवेगळ्या व्यवसायांतले हे संत होते आणि त्यांनी आपल्या अभंगरचनेसाठी आपापल्या व्यवसायातली परिभाषा वापरली व आपापल्या व्यवसायांचे संदर्भ दिले.

संतश्रेष्ट चोखामेळा जातीने महार. त्यांचे सारे कुटुंब-पत्नी सोयरा, बहिण निर्मला, मुलगा कर्ममेळा व मेहूणा बंका-विठ्ठलभक्त होते. तथापि चोखामेळा ह्यांच्या अभंगांतून सामाजिक विषमतेमुळे त्यांना बसत असलेले चटके स्पष्टपणे दिसुन येतात.

उदा. **हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ।**

**मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटू कवण्या रीती ।।**

चातुर्वर्ण्य, जातपात, सोवळेओवळे, विटाळ ह्यांतून पदरी येणारी मानहानी सोसत असतानाच त्यांनी त्याबद्दल आपला निषेधही व्यक्त केला आहे .

**साहित्य-**

संत ज्ञानेश्वरनी ज्ञानेश्वरी,अमृतानुभव,चांगदेवपासष्टी, हरिपाठाचे अभंग व इतर अभंग आणि समाधीच्या वेळेचे नमन प्रकरण अशी त्यांची ग्रंथरचना आहे हि मराठी देशी भाषेत केली.

संत नामदेवांनी विपुल काव्यलेखन करून भागवतधर्म भारतभर पसरवला, अनेक संतांना लिहिण्याची प्रेरणा दिली.

नामदेवांच्या साहित्यात आत्मचरित्रपर अभंग तसेच ज्ञानेश्वरादी भावंडांची चरित्रे आदि, तीर्थावळी आणि समाधी या तीन ओवीबद्ध प्रकरणात सांगितले आहे. याबरोबरच बाळक्रीडा, कृष्णचरित्रपर अभंग, संतचरित्रे व स्फुटरचना यांचा समावेश त्यांच्या साहित्यात होतो. नामदेव अभंगाच्या शेवटी 'नामा म्हणे', 'विष्णुदास नामा' अशी नाममुद्रा लावतात. एकनाथ भागवत,रुक्मिणी स्वयंवर,भावार्थ रामायण,स्फुट काव्य मराठी साहित्य आणि संतपरंपरेत संत तुकारामांचे वाङमय हे मराठी संस्कृतीचे अक्षरलेणे आहे. तुकाराम हे मराठी भाषा आणि साहित्यसंस्कृतीचे मानबिंदू आहेत. त्यांची अभंगवाणी म्हणजे मराठी संस्कृतीची सेवा आहे. तसेच मराठी माणसावर या अभंगवाणीचा संस्कार कोरला आहे. तुकारामांचे साहित्य केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता, त्यांच्या अभंगातून जगाला उपदेश झालेला आहे. म्हणूनच त्यांना 'जगद्गुरू' म्हटले जाते. त्यांनी देशी भाषेत सर्वसामान्य माणसांना जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगितले. त्यांच्या साहित्यातून मानवी कल्याणाचे सार व्यक्त झाले आहे. तसेच मानवेतर प्राणी व सृष्टी याविषयी करुणाभाव व्यक्त झाला आहे.

**भक्तीतून मानवमुक्ती**

भक्ती निमित्त असून माणूस हा भक्तीतून खऱ्या अर्थान माणूस झाला पाहिजे, यासाठी त्यांनी भौतिक गोष्टींचे आचरण करणे आवश्यक आहे. सर्व जीवांच्या ठायी ईश्वर भरलेला आहे, माणूस म्हणून आपण सर्व एक आहोत, अशा उदात्त मूल्यांमुळे माणूस भक्तीच्या माध्यमातून मुक्ती मिळविण्याचा प्रयत्न करतो. या संदर्भात डॉ. रावसाहेब कसबे लिहिताात, "भक्ति आंदोलनाचा विचार नेहमीच ईश्वरकेंद्री पद्धतीने केला जातो. परंतु वास्तविक पाहता भक्ती ही स्वतःला मुक्त करण्याची, स्वतःला हरवण्याची कला आहे. ती परमात्म्याला शोधण्याची कला नाही. भक्त जेव्हा मुक्त होतो, स्वतःच स्वतःला हरवून बसतो तेव्हाच भक्ती सार्थकी लागते. "डॉ. कसबे यांनी भक्ती आंदोलनाकडे मानवी मुक्तीच्या दृष्टीने पाहिले आहे. यासाठी ते सूफी, बाऊल आणि नायनार, आळवार संतांचे दाखले देतात.

**भक्तीचा चळवळीचा प्रभाव सामाजिक चळवळ मध्ये**

भक्ती चळवळीच्या संदर्भात बारकाईने काही गोष्टी समजून घेतल्या तर भक्तीमधील चीड, संघर्ष, आणि व्यवस्थेविरुद्धचा आवाज संतरचनेतून लक्षात येईल. त्यासाठी भक्तीकडे ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. म्हणजे लक्षात येईल की भक्ती ही सामाजिक समतेसाठीची चळवळ आहे. भारतातील भक्ती चळवळ ही येथील ब्राह्मणी व्यवस्थेच्या वाहक असलेल्या संस्कृत भाषेच्या संदर्भात आहे. या काळात संस्कृत भाषेला आव्हान देऊन देशी भाषेत हे ज्ञान आणले जाते. मध्ययुगातील दिखाऊ धर्माच्या विरोधात विद्रोह करू पाहत होते. संतांच्या साहित्यातून हा विद्रोह लक्षात येऊ शकतो. मध्ययुगात सामान्य माणसाचे अस्तित्व हे दबलेले, पिचलेले होते. सामान्य लोकांना आत्मसन्मानाची जाणीव व्हावी यासाठी लोकांचे प्रबोधन केले. मध्ययुगीन बहुतेक संत हे कनिष्ठ जाती वर्गातील होते. उदाहरण- दक्षिणेतील एकूण बारा आळवार संतांपैकी फक्त दोन ब्राह्मण होते. हेच तत्त्व वारकरी संप्रदायालाही लागू होण्यासारखे आहे. नैतिकदृष्ट्या ढासळलेल्या समाजाला जागृत करण्यासाठी, त्यांना बळ देण्यासाठी संतांनी भक्तीची सामाजिक चळवळ उभी केली. संतांच्या मनात बंडखोरी होती, पण ते व्यवहारात विनयशील होते. म्हणून संतांच्या वाङ्मयात कारुण्य भरभरून वाहत आहे. भक्तीची प्रेरणा जरी भगवद्गीतेची असली, तरी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी संतांनी भक्तीचे साहाय्य घेतले आहे.

**निष्कर्ष**

१) महाराष्ट्रा मध्ये भक्ती चळवळ तळागाळातील सामन्या लोका पर्यंत पोहचला त्याप्रमाणे दक्षिण भारतात पहावयास मिळत नाही.
२) महात्मा बसवेश्वर कर्नाटकात भक्तीच्या माध्यामातून सामाजिक चळवळ उभी केल्याचे दिसून येते.
३) भक्ती चळवळीचे नेतृत्व सामन्या जातीतील लोकाने केले आहे.
४) भक्ती साहित्य निर्मिती देशी भाषेत झाली आहे.त्यामुळे लोकजागारानासाठी वाव मिळाला आहे.
५) भक्ती चळवळीत स्त्रियांनी सुद्धा सहभाग घेऊन विचार, अभिव्यक्ती, स्वतंत्र होण्याचा प्रयत्न त्यांच्या साहित्यातून दिसून येते.

**संदर्भ साहित्य**

१) See Monier-Williams, *Sanskrit Dictionary*, 1899.
२) Tharu, Susie J.; Lalita, Ke (1 January 1991). Women Writing in India: 600 B.C. to the early twentieth century. Feminist Press at CUNY.
३) Savitri Chandra. "Historical Background to the Rise of the Bhakti Movement in Northern India"Medieval India and Hindi Bhakti Poetry: A Socio-Cultural Study. Delhi: Har Anand Publications, 1996.
४) Deshpande A.N. 'Prachin Marathi Vangmayacha Itihas' (History of ancient Marathi literature), Part-II, Part-V, Vinus Prkashan, Pune (Marathi)
५) कसबे रावसाहेब, 'भक्ती आणि धम्म', लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई दुसरी आवृत्ती २०१७,
६) मनमाडकर दादामहाराज, 'वारकरी संप्रदाय : तत्त्वज्ञान व सद्यकालीन औचित्य', मनमाडकर प्रकाशन, जून १९९८
७) महात्मा बसवण्णांचा वचनसंदेश - लेखक प्रा. आनंद बळीराम कर्णे

**वर्तमानपत्र**

१) महाराष्ट्र टाइम्स. 25 Apr 2020,
२) A pleasant surprise for the people". The Hindu. 22 March 2006. Retrieved 14 April 2018 – via www.thehindu.com